दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -९७ शुक्रवार,दि.१३ डिसेंबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-97 Friday, Dt.13 December 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ

# बीड जिल्हा बंद

## बंद पाळण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

बीड(प्रतिनिधी):- केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदमध्ये सहभागी होऊन व्यापारी, नागरिकांनी झालेल्या घटनेचा व जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा निषेध व्यक्त करावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



सोमवारी (दि.९) रोजी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच पती सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांचे भरदुपारी अपहरण करण्यात आले आणि ३ तासांनंतर त्यांचा मृतदेह सापडला. अतिशय निघृणपणे त्यांची हत्या करण्यात आली आहे. अपहरण आणि खून यांसारखे गंभीर प्रकरण असताना प्रशासनाने या प्रकरणात योग्य भूमिका घेतली नाही. मारेकर्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न पोलीसांकडून झालेला असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील वातावरण अतिशय दहशतीचे झाले असून यामागे काही विशिष्ट व्यक्तीविशेष आहेत. बीड जिल्ह्यात अक्षरशः बिहार सारखी परिस्थिती होत चालली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावत चालली आहे. या प्रवृत्तीला आळा घालणे ही बाब अत्यावश्यक झाली आहे. स्व.संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. ही मागणी घेऊन व झालेल्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यातील व्यापारी व नागरिकांनी आजचा बंद पाळण्याचे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

## मस्साजोग प्रकरणातील गुन्हेगारांचे जे कोणी आका असतील त्यांना आवरा-आ.सुरेश धस

### जिल्ह्यात इतकी भीषण घटना कधीच झाली नव्हती

आष्टी (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील मस्साजोग येथील मयत सरपंच स्व.संतोष जाधव यांच्या कुटुंबाची आ.सुरेश धस यांनी बुधवारी भेट घेत बीड जिल्ह्यात कधी नव्हे अशी भीषण घटना घडली असून या घटनेमुळे केवळ केज तालुकाच नाही तर संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये




संताप व्यक्त केला जातोय. या गुन्हेगारांच्या पाठीमागे जे कोणी आका असतील त्यांना त्यांच्या आकांनी वेळीच आवरा

केज पोलीस ठाणे की, गुंडाचा अड्डा झाला असून बीडचे बिहार नाही अफगाणिस्तान मधील

(उर्वरीत पान २ वर)

## 'सपनो का सौदागर'

हिंदी चित्रपटांना जगभरात पोहचविणारा शोमॅन अशी एक प्रकारे नवी ओळख मिळवून देणारा अभिनेता व दिग्दर्शक, निर्माता म्हणजे राजकपूर, आशयघन पटकाथा आणि संगीत यांची मेजवानी ठरणारे चित्रपट निर्माण करताना सामाजिक संदेश देण्याचं मुल्यवान काम या महान चित्रपट दिग्दर्शकाने केलं. अनेकांना पडद्यावर आणण्याचं काम करताना आपण या चित्रसृष्टीचे खऱ्या अर्थानं 'सपनो का सौदागर' असल्याचे आपल्या कामातून राज कपूर यांनी दाखवून दिलं.

वयाच्या केवळ १० व्या वर्षी 'इन्कलाब' चित्रपटातून सुरु झालेला हा प्रवास अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता म्हणून वळणं घेत मृत्यूने गाठेपर्यंत अविरत सुरु राहिला. १४ डिसेंबर २०२४ हे या महान कलाकाराचे १०० वा जयंती दिन आणि या प्रवासावर थोडा प्रकाश टाकायला देखील प्रदीर्घ लिखाण करावं लागेल.पृथ्वीराज कपूर यांचा पुत्र म्हणून चित्रपट सृष्टीला आरंभीची ओळख मात्र त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास लिहिताना कपूर घराणं विस्तारलं आर.के. फिल्म्स हा ख्यातनाम ब्रॅन्ड बॉलीवूडला देणाऱ्या राजकपूर यांच्या चित्रपटांची यादी खूप मोठी आहे. यश-अपयश हा प्रवास देखील या काळात अनुभवला आणि 'बॉबी' सारख्या चित्रपटातून पुन्हा यशस्वी होण्याचं कसब या अभिनेत्याकडे होतं.१९४८ साली आर. के. फिल्म्स सुरू केल्यावर दिग्दर्शनाकडे वळलेल्या राजकपूर यांना पहिलं मोठं यश 'बरसात' चित्रपटात मिळालं त्या आधीचे त्यांचे २ चित्रपट तिकिटबारीवर फारसा चमत्कार करू शकले नव्हते. त्याच वर्षी दिलीपकुमारसह केलेला चित्रपट 'अंदाज' देखील यशस्वी ठरला. त्यानंतर यशाची गुरुकिल्लीच जणू गवसली व यश मिळत गेले.'आवारा' चित्रपटाने भारतातच नव्हे तर सोव्हियत युनियन (तत्कालीन) चीन, अफगाणीस्तान तुर्की देशातही यश मिळवले मध्य आशियाचा एक लोकप्रिय अभिनेता म्हणून राज कपूरला ओळख प्राप्त झाली सोबतच लोकप्रिय झाली ती राजकपूर आणि नर्गिस यांची जोडी या जोडीची केमिस्ट्री अफलातून होती व रसिकांवर जोडीने जणू गारूड केले असा तो काळ १९५५ चा श्री ४२० आणि १९५६ चा चोरी चोरी यांनी आगळा इतिहास घडवला.




नंतर गाजलेली चित्रपट म्हणजे संगम राजेंद्रकुमार,वैजयंतीमाला व राजकपूर आणि प्रेमाचा त्रिकोण हो त्रिकोण आजपर्यंत हिंदी चित्रपटांना कथा पुरवताना दिसतो.२ मध्यांतरे असणारा मेरा नाम जोकर या चित्रपटानं राजकपूर याचं आर्थिक गणित कोलमडलं मात्र खचून न जाता आपला मुलगा ऋषी कपूरला घेउन डिंपल कपाडिया सोबत काढलेल्या 'बॉबी' मधून राजकपूर यांनी पुन्हा गगन भरारी घेतली.

१९७० ते ८० मध्ये सत्यम शिवम् सुंदरम, प्रेम रोग, राम तेरी गंगा मैली अशा सुपरहिट चित्रपटांसह नवे चेहरे रुपेरी पडद्यावर आणण्याचे व हिट करण्याचं काम देखील तितकच महत्वाचं आणि या चित्रपटातून सामाजिक प्रश्न देखील नेमकेपणने मांडण्याचं काम केलं हे विसरता येणार नाही

पद्मभूषण आणि दादासाहेब फाळके पुरस्कार विजेत्या राजकपूर यांनी जे चित्रपटांना दिलं ते अतिशय अनमोल आहे सोबतच पुढच्या पिढीतील वारसा येण्याच्या आधी भाऊ शशीकपूर, शम्मी कपूर यांनीही वेगळी ओळख निर्माण केली. त्यापुढच्या पिढीत रणधीर कपूर, ऋषी कपूर, राजीव कपूर व नंतर करिष्मा कपूर, करिना कपूर, रणबीर कपूर अशी खूप मोठी जंत्री सांगता येईल.दुसऱ्या बाजूला कपूर घराण्यातीलच सुरिंदर कपूर, बोनी कपूर,अनिल कपूर,संजय कपूर असा उल्लेख करताना अगदी सलमा आगापर्यंत कपूर घराण्याचे वारस... जन्मशताब्दी वर्षात पुन्हा एकदा राजकपूर ERA डोळ्यासमोर आणावा व बघावा लागणार आहे.

**(प्रशांत विजया अनंत दैठणकर)**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**बीड**

## पवार साहेबांच्या वाढदिवसानिमीत्त बीडमध्ये कार्यक्रम

### उत्कृष्ट विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिलांचा सन्मान

बीड (प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, देशाचे नेते पद्मविभूषण खा.शरदचंद्र पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उत्कृष्ट विद्यार्थी, जेष्ठ नागरिक व विशेष कार्य केलेल्या महिला यांचा सन्मान करण्यात आला.

गुरुवारी (दि.१२) रोजी खा.शरदचंद्र पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरच्चंद्र पवार यांच्या वतीने बीड शहरातील राष्ट्रवादी भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमात



उत्कृष्ट विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि विशेष कार्य केलेल्या महिला यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम, माजी आ.उषाताई दराडे, राजेंद्र मस्के यांच्यासह बीड राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शासन व्हावे - धनंजय मुंडे

**संतोष देशमुख हत्या प्रकरण फास्ट्रॅक कोर्टात चालवले जावे, धनंजय मुंडेंचे मुख्यमंत्री व पोलीस अधीक्षकांना पत्र**

**या प्रकरणाच्या आडून कुणीही राजकारण आणि जिल्ह्याची बदनामी करू नये - धनंजय मुंडे यांचे आवाहन**



परळी /प्रतिनिधी

मस्साजोग येथील सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण अत्यंत दुर्दैवी व गंभीर स्वरूपाचे आहे. या स्वरूपाची गुन्हेगारी हे समाज विघातक असून अशा वृत्तीला वेळीच ठेचले गेले पाहिजे, यासाठी या प्रकरणातील सर्वच्या सर्व आरोपींना

(उर्वरीत पान २ वर)

## लोकनेत्याच्या अभिवादनास गोपीनाथगडावर राज्यभरातून मोठी गर्दी !

### मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही - पंकजाताई मुंडे

परळी /प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी आपलं अखंड आयुष्य कमळ रुजविण्यात घातलं आणि शेवटी कमळातच त्यांनी विसावा घेतला. वंचित, उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देत असताना ज्यांचा कोणी वाली नाही त्यांचा कैवारी होण्याचे काम मुंडे साहेबांनी केलं. धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी सर्वंकष राजकारण केलं, हाच संस्कार व विचार घेऊन आपण वाटचाल करत आहोत. आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत मुंडे साहेबांचे संस्कार व विचार मी संपू देणार नाही असा निर्धार भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ.पंकजाताई मुंडे यांनी आज गोपीनाथ गडावर बोलताना व्यक्त केला.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त गोपीनाथ गडावर आज राज्यभरातून मुंडे

(उर्वरीत पान २ वर)



## फाशीची शिक्षा झाली पाहिजे - माजी आमदार अॅड.उषाताई दराडे




बीड /प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृणपणे खून करण्यात आला. हा खून ईतका निर्घृण होता की माणुसकीची हत्याच झाली. एक कुटुंब उघड्यावर पडले. या घटनेचा मी तीव्र शब्दात धिक्कार करते निषेध नोंदवते अशी प्रतिक्रिया माझी आमदार अॅड उषाताई दराडे यांनी दिली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे

(उर्वरीत पान २ वर)



बीड - शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटलच्या तज्ञ डॉक्टर मीरा प्रशांत ढाकणे ( नागरे ) यांनी हॉस्पिटलला भेट दिल्याबद्दल आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा पत्रकार शेख आयेशा रफिक यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय

# टोकदार दुफळीचे वर्तमान

काँग्रेसने 'अदानी' या एकाच उद्योग समूहाला सातत्याने व तीव्रतेने लक्ष्य करण्याचा एक कोनही या संघर्षाला आहे. आज काँग्रेससोबत असणारे सगळेच मित्रपक्ष हे कधी ना कधी काँग्रेसच्याच विरोधात लढले आहेत; किंबहुना ममता व इतर नेते भाजपप्रणित एनडीए आघाडीतही काम करून आले आहेत.

महाराष्ट्रातील विधानसभा निकालांचे राष्ट्रीय राजकारणावर व्यापक परिणाम होणार होतेच. ते जसे सत्ताधारी आघाडीवर होत आहेत; तसेच विरोधकांच्या 'इंडिया'वरही होत आहेत. विरोधकांच्या या आघाडीतील अनेक पक्षांनी व नेत्यांनी काँग्रेसच्या विरोधात सूर लावला आहे. तसा सूर महाराष्ट्रात काँग्रेसची कामगिरी लोकसभा निवडणुकांप्रमाणेच झाली असती तर लागला असता का, याचा विचार करण्यासारखा आहे. मात्र, राजकारण हे असेच असते. नाही तर आपला ऐतिहासिक पराभव विसरून शरद पवार यांच्यासारखे ज्येष्ठ नेते 'इंडिया'चे नेतृत्व ममता बॅनर्जी यांना देण्यास अनुकूल झाले नसते.

विरोधकांचे हे आपापसातले राजकारण शेवटी कुणाच्या लाभाचे ठरणार आहे, हे वेगळे सांगायला नको. काँग्रेसने 'अदानी' या एकाच उद्योग समूहाला सातत्याने व तीव्रतेने लक्ष्य करण्याचा एक कोनही या संघर्षाला आहे. आज काँग्रेससोबत असणारे सगळेच मित्रपक्ष हे कधी ना कधी काँग्रेसच्याच विरोधात लढले आहेत; किंबहुना ममता व इतर नेते भाजपप्रणित एनडीए आघाडीतही काम करून आले आहेत. भारतीय राजकारणात काँग्रेससारख्या ऐतिहासिक, देशव्यापी आणि सर्वाधिक सत्ता उपभोगलेल्या पक्षावर अशी एकाकी पडण्याची वेळ का आली आहे; हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो. काँग्रेसने त्याचे उत्तर आत्मपरीक्षण करून आणि इतरांनी भारतीय संसदीय लोकशाहीच्या भवितव्याच्या चिंतेतून शोधायला हवे आहे.

संसदेचे सध्याचे अधिवेशन अक्षरश: वाहून चालले आहे. यातला मुख्य संघर्ष काँग्रेस आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्ष यांच्यातला आहे आणि तो सध्या तरी अदानी यांच्याभोवतीच घोंघावतो आहे. काँग्रेस आणि विशेषत: राहुल गांधी यांच्याबद्दल इतर विरोधी पक्षांची व ज्येष्ठ नेत्यांची नाराजी नवी नाही. मात्र, लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने गेल्या दोन निवडणुकांपेक्षा भरीव कामगिरी केल्यामुळे राहुल गांधी हे सगळ्या विरोधकांचे नेते आहेत; असे चित्र निर्माण झाले होते. त्यांना विरोधी पक्षनेतेपद मिळाल्याने त्यांच्या या नेतृत्वाला एक अधिकृतताही आली होती. मात्र, महाराष्ट्रातील काँग्रेसच्या पराभवाने सारे चित्रच पालटून गेले आहे. त्यातच, अदानी हा देशव्यापी मुद्दा होऊ शकत नाही आणि केवळ त्या मुद्द्यावर संसदेचे कामकाज रोखून धरणे योग्य नाही, असे काँग्रेसेतर विरोधकांचे मत दिसते. ते योग्यच आहे.

विशेष म्हणजे, देशातील सर्व पक्षांची राज्य सरकारे कधी ना कधी अदानी समूहाला आपापल्या राज्यात निमंत्रण देत असताना किंवा आधीच्या केंद्र सरकारांनी अदानी समूहाला भरपूर वाव दिलेला असताना त्यालाच लक्ष्य करून संसदच चालू द्यायची नाही, हा दृष्टिकोन टोकाचा आहे. अदानी यांना काँग्रेसने असे लक्ष्य केले नसते आणि संसदेचे कामकाज होऊ दिले असते तर भारतीय जनता पक्षाने सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस यांच्या कथित संबंधांचे आरोप केलेही नसते. मात्र, अदानी यांच्यावर अमेरिकेत झालेले आरोप आणि सोरोस व सोनिया गांधी यांच्या कथित संबंधांचा आरोप यांचा एक आंतरसंबंध आहे. तो आहे, भारताच्या विरोधात जगात आणि विशेषकरून अमेरिकेत होत असणाऱ्या हालचालींचा. अदानींवरील आरोपांना 'देशविरोधी' रंग असल्याचे अधोरेखित करण्यासाठी भाजपने हे नवे प्रकरण पुढे आणले आहे.

लोकसभेचा गेल्या दोन खेपांपेक्षा वेगळा कौल दिलेले भारतीय नागरिक या अधिवेशनाकडे अपेक्षेने पाहात होते. विरोधकांची वाढलेली संघटित ताकद मोदी सरकारसाठी आव्हानात्मक ठरू शकली असती. मात्र, अधिवेशनादरम्यानच 'इंडिया'च्या नेतृत्वाचा मुद्दा शरद पवार, लालू यादव यांच्यासहित अनेक बड्या नेत्यांनी उपस्थित करणे म्हणजे विरोधकांमध्ये फूट असल्याची जाहीर वाच्यताच होती. मित्रपक्षांना विश्वासात घेऊन वागण्याची काँग्रेसला सवय नाही, अशी टीका होत आहे. ती योग्य आहे. मात्र, आपल्या सगळ्या प्रमुख नेत्यांना काय वाटते, याचा तरी विचार काँग्रेसचे नेतृत्व करते की नाही, याची शंका आहे.

---

### स्थानिक गुन्हे शाखा बीडने वडवणी येथील सोयाबीनच्या कट्टयाची घरफोडी करणारी टोळी निष्पन्न करुन

# २ आरोपी जेरबंद करत १७ क्विंटल सोयाबीन जप्त केले

बीड राजयोग प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक साहेब, बीड यांनी घरफोडीचे मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून श्री. उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी घरफोडी करणारे आरोपींची गोपनिय माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन केले आहे.

श्री.राजेंद्र हनुमंद माळी, व्यवसाय शेती, रा.गोपळनगर वडवणी यांनी फिर्याद दिली की, दिनांक २६/११/२०२४ रोजी दुपारी ०४०० वा ते दि.२८/११/२०२४ वा चे दुपारी ०४०० वा. चे दरम्यान विनय नहार यांचे किरायाने केलेल्या गोडाऊन मध्ये ठेवलेले ३४ कट्टे एकुण २४ क्विंटल एकुण ९९६००/- रु चा सोयाबीनचा मुद्देमाल अज्ञात आरोपीतांनी गोडाऊनचे शेटरचे कुलूप तोडुन चोरुन नेले होते त्यावरुन पो.स्टे. वडवणी येथे गुरनं ३१५/२०२४ कलम ३३१(४),३०५(अ) भान्यासं प्रमाणे पो.स्टे.वडवणी येथे दिनांक २९/११/२०२४ रोजी गुन्हयाची नोंद झाली होती. सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना दिनांक ११/१२/२०२४ रोजी स्था.गु.शा.बीड येथील पोउपनि सुशांत सुतळे यांना गोपनिय बातमी




मिळाली की, विनय नहार यांचे किरायाने केलेल्या गोडावुन मधील सोयाबीने कट्टे मौजे पांगरी ता.परळी येथील एक गोडावुन मध्ये विक्रीसाठी ठेवलेले असुन सोयाबीनेचे कट्टे हे माखनसिंग शेरसिंग टाक व त्याचे सोबतचे साथीदार यांनी मिळुन चोरले आहे. अशी खात्रीशिर माहिती मिळाल्यावरुन सदर खबर पोनि श्री. उस्मान शेख यांना कळवुन त्यांनी पुढील कार्यवाही करुन गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांचे पथकासह तात्काळ पाचारण होवुन माखनसिंग टाक याचा शोध घेवुन ताब्यात घेतले व त्यास गुन्हयाअनुषंगाने चौकशी केली असता त्याने त्याचे इतर सोबतचे साथीदार मोहन तुपसमुद्रे रा. पांगरी ता.परळी, जि.बीड व इतर तीन आरोपी (फरार) अशा एकुण ०५ जनांनी मिळुन चोरी केलेली असल्याचे सांगितले. सदर आरोपींचे ताब्यातुन सोयाबीनचे ३४ कट्टे वजनी १७ क्विंटल कि.७०५५०/- व गुन्हयात वापरलेली अशोक लिलॅन्ड पिकअप जप्त करण्यात आले आहे.

दोन आरोपी व सोयाबीनचे ३४ कट्टे पो.स्टे.वडवणी यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन उर्वरित तीन आरोपींचा शोध चालु आहे. सदर आरोपीतांकडुन आणिखीन इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे, पोह/ मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, राजु पठाण, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह वडमारे यांनी मिळुन केलेली आहे.

---



ठाणे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांची आज ठाणे येथील निवासस्थानी भेट घेऊन मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरणाचा तपास सी.आय.डी.व पोलीस महासंचालक यांच्या मार्फत करावा अशी मागणी केली.
साहेबांनी पोलीस महासंचालकांना कारवाई करण्या संदर्भात आदेशित केले.यावेळी जिल्हाप्रमुख सचिन भैया मुळूक,जिल्हा प्रमुख स्वप्नील गलधर, नांदेडचे आमदार आनंद बोंडारकर व आमदार बाबूराव कदम.

---




## नाभिक महामंडळाच्या शिरूर तालुकाध्यक्षपदी तुकाराम राऊत यांची निवड

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर तालुक्यातील बावी येथील युवा कार्यकर्ते तुकाराम भगवान राऊत यांची राज्य नाभिक महामंडळाच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.तुकाराम राऊत यांचे सामाजिक कार्य आणि कामाविषयी असणारी आवड पाहून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तुकाराम राऊत यांना तालुकाध्यक्ष निवडीचे नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांनी दिले असून आगामी काळात महाराष्ट्र नाभिक महामंडळाचा प्रचार,प्रसार करण्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.तुकाराम राऊत यांच्या निवडीचे तालुक्यातील समाज बांधवांनी स्वागत करून अभिनंदन केले आहे.

---

# जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी ने बाधित खरीप पिकांच्या नुकसान भरपाई पोटी ४१२ कोटी रुपये अनुदान

### आमदार बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा

जालना /राजयोग प्रतिनिधी

वंचित, पीडित, विस्थापित, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी वर्गाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याकरिता गेल्या ४० वर्षापासून अविरत संघर्ष करणारे लोकप्रिय लोकप्रतिनिधी म्हणून राज्यभरात ओळख असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश आले आहे. जालना जिल्ह्यातील २ लाख ८२ हजार ५३८ शेतकऱ्यांचे खरीप हंगाम २०२४ मध्ये अतिवृष्टी, गारपीट वादळ वारा आणि पुरामुळे २ लाख ५५ हजार ५१९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. खरीप पिका सह फळबागांच्या नुकसानी पोटी जालना जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार लोणीकर यांच्या आग्रही मागणी नुसार जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांसाठी सुमारे ४१२ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मंजूर केले आहे. या मूळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा मिळाला आहे. ०१सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीने आलेल्या पुरामुळे, सततधार झालेल्या पावसासह वादळ वारा आणी गारपीटीने मंठा व परतूर तालुक्यातील झालेल्या नुकसानीची पाहणी भरपावसात माजी मंत्री तत्कालीन आमदार बबनराव लोणीकर यांनी पोळा सणाच्या दिवसी गावा गावात जाऊन केली होती. यावेळी अतिवृष्टीने बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले होते. याबाबतीत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी तहसील कार्यालय मंठा व तहसील कार्यालय परतूर येथे आढावा बैठक घेऊन मंठा परतूर व जालना तालुक्यातील गावा गावातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची व पडझड झालेल्या नुकसानग्रस्त घरांची तातडीने पंचनामा करून जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानंतर तातडीने लगेचच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधित खरीप हंगामातील पिका सह फळबागा च्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात करिता तातडीने विभागीय आयुक्त यांच्याकडे अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या



सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जून ते ऑक्टोबर, २०२४ या महिन्यात अतिवृष्टी/पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. या अनुषंगाने तातडीने

ऊ्नढ पोर्टलव्दारे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सदरील अनुदान निधीतून कुठल्याही प्रकारच्या कर्जाची वसुली करण्यात येऊ नये असे आदेश शासन निर्णयान्वये पारित झाले आहे. सदरील अनुदान प्रति शेतकरी तीन हेक्टर पर्यंत मर्यादित असल्याची देखील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले असल्यामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून गावागावातील शेतकरी बांधव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानत आहेत.

---

पान १ वरून...

**मस्साजोग प्रकरणातील...**

काबुल होईल. इराक सारखी परिस्थिती। झाली असून रोजच बॉम्ब स्फोट रोज नवीन घटना होतील. या प्रकारातील मुख्य आरोपींना तात्काळ अटक करून त्यांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी आ.सुरेश धस यांनी केली आहे.

यावेळी आ.सुरेश धस यांनी देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले.याप्रसंगी उपस्थित माध्यमांशी संवाद साधताना आ.धस म्हणाले की,अशा प्रकरणात तरुण मुले ज्या गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळत आहेत.त्यांना वेळीच आवर घालण्याची गरज आहे.दरम्यान लवकरच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटून या प्रकरणाचे निपक्षपातीपणे चौकशी करण्याची मागणी करणार असल्याचे सांगत अपहरण झाल्यानंतर तीन तास गुन्हा नोंद का झाला नाही ? शिवाय यामध्ये जे कोणी पोलीस दोषी असतील त्यांच्यावर पण कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी देखील यावेळी आ.सुरेश धस यांनी केली.

आ.सुरेश धस यांनी बीडचे पोलीस अधीक्षक यांची घेतली भेट

मा.सरपंच स्वर्गीय संतोष देशमुख यांचे अपहरण करुन क्रूरतेने खून करण्यात आला. या दुर्दैवी घटनेला ४ दिवस होऊन देखील देशमुख यांचे मारेकरी मोकाट फिरत आहेत.

या प्रकरणी पोलीस चौकशी वेगवान व्हावी आणि पोलीस तपास विशेष अधिकारी व पथक नेमुन अधिक माहिती घेण्यासाठी बीडचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची आ.सुरेश धस यांनी बीड येथे भेट घेतली. संबंधित प्रकरणातील आरोपीला तात्काळ अटक करून देशमुख कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी मागणी यावेळी त्यांनी केली.

**स्व.संतोष देशमुख....**

कठोर शासन केले जावे असे मत धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले आहे.

आज लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्यात आले होते, त्यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना याविषयी आपले मत व्यक्त केले.

अशा स्वरूपाची गुन्हेगारी ही घातक असून पुन्हा वेळीच कठोर शासन केले जावे व देशमुख कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवले जावे असेही धनंजय मुंडे म्हणाले.

संतोष देशमुख हत्येच्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक केली जावी तसेच हे प्रकरण फास्ट्रॅक कोर्टात चालवले जावे या संदर्भात धनंजय मुंडे यांनी एक पत्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनाही दिले आहे.

गुन्हेगारी ही एक अपप्रवृत्ती आहे, तिला जात नसते, मात्र या प्रकरणाचा अडून काही जण जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करून जातीय तेढ निर्माण करण्याचा तसेच या

पान १ वरून...

दुर्दैवी घटनेच्या आडून राजकारण साधण्याचा प्रयत्न करत असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले.

पवनचक्कीच्या संदर्भातील कामाच्या वादातून ही हत्या झाल्याचे समजते, मात्र जाणीवपूर्वक याआडून बीड जिल्ह्याची बदनामी केली जात आहे. पोलीस यंत्रणा, तपास यंत्रणा तसेच न्यायव्यवस्था या माध्यमातून संतोष देशमुख यांना नक्कीच न्याय मिळेल, कुणीही नाहक जिल्ह्याची बदनामी करू नये, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना केले आहे.

**लोकनेत्याच्या अभिवादनास ...**

प्रेमींनी सकाळ पासूनच दर्शनाला गर्दी केली होती. यावर्षीचा समारंभ साधेपणाने साजरा करणार असल्याचे आमदार पंकजाताई मुंडे यांनी जाहीर केले होते तथापि, गोपीनाथ गडावर लोकनेत्याला अभिवादन करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून जनसागर उसळला होता. दुपारी हेलीकॉप्टरने आगमन होताच आ. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांनी लोकनेत्याच्या समाधीला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मातोश्री प्रज्ञाताई मुंडे,पंकजाताई मुंडे यांचा मुलगा आर्यमन , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, आ.मोनिका राजळे, आ. मनोज कायंदे , माजी आ. भीमराव धोंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, ओबीसी नेते लक्ष्मण हाके आदींसह राज्यभरातून आलेले मान्यवर प्रमुख नेते, कार्यकर्ते उपस्थित होते.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त समाधी परिसरात भजनी मंडळाच्या पथकाने उत्कृष्ट भजन सादर केले, यात स्वतः पंकजाताई मुंडे, डॉ. प्रीतमताई मुंडे काही काळ सहभागी झाल्या होत्या.

आयुष्य जनतेसाठी समर्पित

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, पालकमंत्री म्हणून पाच वर्ष मी या जिल्ह्याची प्रामाणिक सेवा केली.कधीही जात पात धर्म बघितला नाही.मुंडे साहेबांचे हेच संस्कार आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे हा तुमचा- माझा - आपल्या सर्वांचा स्वाभिमान असून त्यांचे संस्कार व विचार संपू न देणं हे आपलं कर्तव्य आहे. संस्कार, विचार व सर्वांचा विकास या सूत्रावर वाटचाल करताना आपले आयुष्य जनतेसाठी समर्पित आहे.ही वाटचाल करताना आपण कधीही डगमगणार नाही. उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही.

मुंडे साहेबांचे संस्कार व विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही

गेल्या काही दिवसापासून आपली तब्येत व्यवस्थित नाही आजारी असल्याने व डॉक्टरांनी गर्दीत जाऊ नका असं सांगितल्याने आणि सध्या दौरे व कार्यक्रम बंद आहेत परंतु माझ्यापेक्षाही जास्त तुम्ही मुंडे साहेबांवर प्रेम करतात आणि न चुकता तीन जून व बारा डिसेंबरला गोपीनाथ गडावर येता. माझा तर जन्म मुंडे साहेबांच्या पोटी झाला असल्याने मी येणार नाही असे होऊ शकत नाही मुंडे साहेबांनी दिलेले ते संस्कार आणि त्यांचे विचार शेवटच्या श्वासापर्यंत संपू देणार नाही.

सर्वांचा विकास हे सूत्र घेऊन राजकारणात काम

पान १ वरून...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची विकासाकडे वाटचाल सुरू असून महाराष्ट्रातही जनतेने आपल्याला भरभरून आशीर्वाद दिले आहेत राज्यभरात सर्व ठिकाणी मी सहभाग घेतल्या आपल्याला जनतेने सत्ता दिली आहे आपल्या मराठवाड्याला न्याय मिळवून देण्याचं काम करायचं आहे. बीड जिल्ह्याचे सुरक्षित लोकजीवन व सर्वांचा विकास करण्याचा आपला सातत्याने प्रयत्न राहिला आहे आणि या सरकारच्या माध्यमातूनही एक काम करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

गुन्हेगार तो गुन्हेगारच :कोणाच्या जीवावर उठण्याएवढा असूरीपणा असू नये

बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीवर पंकजाताई मुंडे यांनी चिंता व्यक्त केली.केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व हत्या अतिशय दुर्दैवी व संतापजनक घटना आहे.या कुटुंबीयांच्या दु:खात मी सहभागी आहे. याबाबत मी मुख्यमंत्र्यासह संबंधितांना बोलले आहे. त्याचबरोबर परळीतील अमोल विकासराव डुबे यांचे अपहरण करून लूटमार करण्यात आली.या दोन्ही घटनेतील दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे .या घटनांबद्दल मी प्रचंड संताप व्यक्त करते.बीड जिल्ह्य़ात अशी गुन्हेगारी चालू देणार नाही. गुन्हेगारी रोखण्याचा प्रयत्न हवा पण जिल्ह्याची बदनामी करु नका.दुःखद घटनांकडे दुःख म्हणून बघा यात राजकारण नको असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.दरम्यान, मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी संध्याकाळपर्यंत रांग लागली होती. यावेळी आयोजित महाप्रसादाचा हजारो लोकांनी लाभ घेतला.

**फाशीची शिक्षा झाली...**

की,फाशी झाली पाहिजे म्हणजे गुन्हेगाराला फाशीची शिक्षा होईल असा स्वच्छ तपास पोलीस यंत्रणेकडून होणे अपेक्षित आहे.घटनेत ग्रामस्थांच्या तीव्र भावना आहेत. जिल्हयात भीतीचे वातावरण आहे. पोलिसांवर ग्रामस्थांचा आरोप आहे की, त्यांच्या सहकार्या शिवाय ही घटना घडू शकत नाही. त्यामुळे तपास सीबीआय मार्फत केला जावा, तपासात त्रुटी रहाता कामा नये.बीड जिल्हा एकेकाळी पुरोगामी होता. आता गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. पोलिसांचा धाक वाटत नाही. कारण लागेबांधे असावेत.परवा परळीत व्यापारी हुंबे यांचे अपहरण केले गेले. कायदा सुव्यवस्था पार मोडकळीस आली आहे.आरोपीना जात नसते. गुन्हेगारी हीच त्यांची जात असते. गुन्हेगारांना शासन झालेच पाहिजे. पण समाजानेही जातीय सलोखा जपावा. मानवता ही एकच जात जपावी.

पुन्हा एकदा मी संतोष देशमुख यांच्या हत्येसाठी ज्यांनी ज्यांनी काम केले त्या सर्वांना त्वरित अटक करावी व तपासात राजकीय हस्तक्षेप कोणी करू नये अशी भावना व्यक्त करते.

संतोष देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली.त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मी सहभागी आहे असे प्रसिद्धी पत्रकात माजी आमदार अँड उषाताई दराडे यांनी म्हटले आहे.

# आष्टीत रिपाईच्यावतीने परभणी येथील घटनेचा निषेधार्थ निदर्शने तहसीलदारांना निवेदन

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्यावतीने परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोर असणा–या संविधानाच्या प्रतिमेला दगडाने फोडून विटंबना करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याच्या कृतीच्या निदर्शन करण्यात यावे हे मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.



या निवेदनात असे म्हटले आहे की, परभणी येथे स्टेशन रोड भागातील जिल्हाधिकारी कार्यालया समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. तेथे संविधानाची सिमेंटपासुन बनवलेली प्रतिकृती असुन तिला काचेचे आवरण होते. एका माथेफिरूने दिनांक १०/१२/२०२४ रोजी सायंकाळी प्रतिकृतीची काच फोडली या कृत्यामुळे आपल्या भारत देशातील संविधानाचा अपमान झाला आहे. त्यामुळे संपुर्ण भारत देशातील संविधान प्रेमी यांच्या भावना दुखावल्या आहेत. या कृतीचा आष्टी तालुका रिपब्लीक पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांच्या वतीने जाहिर निषेध करित असुन सबंधीत आरोपी विरूध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

या निवेदनावर रिपाईचे नेते जिल्हा उपाध्यक्ष अरूण (भैय्या) निकाळजे,शशिकांत निकाळजे,सादीक कुरेशी,बाजीराव वाल्हेकर,बब्बूभाई अत्तार,सामाजिक कार्यकर्ते अशोक निकाळजे,नितिन निकाळजे,सागर खंडागळे,सागर निकाळजे,बबलू निकाळजे,संदेश निकाळजे,हर्षवर्धन निकाळजे,सम्राट औसरमाल,गनिराव भालेकर,हौसराव भालेकर,मिलींद निकाळजे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.




आष्टी – लोकनेते,संघर्षयात्री, स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची भारतीय जनता पार्टी व आ.सुरेश अण्णा धस मित्र मंडळाच्यावतीने जयंती साजरी करून त्यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी आष्टी तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## टीसी हरवला आहे

धनंजय शिवाजी बागलाने या नावाचा १२ वी पास असलेला टीसी बीड – संभाजीनगर प्रवासा दरम्यान बीड बस स्थानक परिसरातून हरवला आहे.

कृपया सापडल्यास संपर्क करावा.

**धनंजय बागलाने**

मोबाईल नंबर ७० ५७ ६९ २९ ३९.

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २७/२०२४**
**कृष्णा यादवराव वडमारे विरूध्द ग्रा.पं. कुंभारी**
**कृष्णा यादवराव वडमारे**
**रा. कागदीवेस, बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत मथुराबाई भ्र. भिमराव वडमारे यांचा दिनांक ०५/०७/२००७ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यू यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास ब.कुंभारी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १६/१२/२०२४ ही आहे.

**स्वाक्षरित**
**तहसीलदार,बीड करीता**

## चौकशीची जाहीर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड (प्रेमपद्म (नहार) बिल्डींग, औटी मंगल कार्यालयाजवळ, एस.बी.आय. समोर, जालना रोड, बीड ४३११२२)**

चौ.क्र. २१/२०२४ कलम ५० अ (१)

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक – श्री. रामलिंग चौंडेश्वरी देवस्थान कोष्टी समाज,अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड

नोंदणी क्रमांक – ए – २३६७ (बीड) या दाखल केलेल्या योजना अर्जाबाबत. अर्जदार :– १. श्री. नारायण भीमराव हरेगावकर व इतर ०८ यांनी दाखल केलेल्या या न्यासाचे योजना अर्जाबाबत.

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त – २, बीड विभाग, बीड हे वर नमुद केलेल्या न्यासासंबंधी योजना अर्ज याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम – ५० अ(१) अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

सदर न्यासास योजना/घटना मंजुर आहे काय?

सदरच्या योजना अर्जासंबंधी चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्यातारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने स्वत: हजर राहुन किंवा विधिज्ञांमार्फत पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. सदर योजनेचा मसुदा कार्यालयात पहावयास मिळेल.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड विभाग, बीड यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक १९/१२/२०२४ रोजी दिली.

शिक्का

**स्वाक्षरित**
**अधिक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बीड विभाग, बीड**

**:: जाहीर प्रगटन ::**

**गट नं. २९८**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९८ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०० हे. ४४ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०० हेक्टर ४४ आर असून त्याचा आकार ०० रू. ३७ पैसे गट क्र. २९८ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९८ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. २९९ उत्तरेस - गट नं. २९७

गट नं. २९८ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | गेमा धनाजी राठोड | १४६ | ०.४४ | ००.०० | १ |

**गट नं. २९९**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९९ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०० हे. ५६ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०० हेक्टर ५६ आर असून त्याचा आकार ०० रू. ४७ पैसे गट क्र. २९९ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९९ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. ३०० उत्तरेस - गट नं. २९८

गट नं. २९९ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | रचना सचिन जाधवर | १७७४ | ०.५६ | ००.०० | २७९४ |

**गट नं. ३००**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र ३०० राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०२ हे. ६१ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०२ हेक्टर ६१ आर असून त्याचा आकार ०२ रू. १८ पैसे गट क्र. ३०० मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क ३०० शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९२ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. ३०२ उत्तरेस - गट नं. २९९

गट नं. ३०० या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | रचना सचिन जाधवर | १७७४ | २.६१ | ००.०० | २७९४ |

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील शेत जमीन गट क्र २९८, २९९ व ३०० या बाबत आमचे पक्षकार यांचे सोबत व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच आमचे पक्षकार सदरील शेत जमीन कायम खरेदीखता आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या प्रकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच रजिस्टर्ड खरेदीखत आधारे खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर शेत जमीन गट क्र २९८, २९९ व ३०० हा निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे शेत जमीन गट क्र. २९८, २९९ व ३०० चे वरील संपूर्ण मुळ मालकाने आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरीलशेत जमीन गट क्र. २९८, २९९ व ३०० च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी, व इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ७ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी. कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर गटातील संपूर्ण मिळकत निर्वाद आहे असे समजून कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेत जमीन गट क्र २९८, २९९ व ३०० मधील संपूर्ण गटातील संपूर्ण व मुळ मालकाकडून खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील वत्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी वरील नमूद गट क्र. २९८, २९९ व ३०० या ७/१२ अभिलेख मधील जे वहीती हक्कात आहेत किंवा मयत आहेत ते त्यांचे वारस बाबत तसेच सहमती पत्र देणार आहेत व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास नमूद शेतकरी यांच्याकडून खरेदी खत करून आमचे पक्षकार यांच्या हक्कात देणार आहेत. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत :- जाहीर प्रगटन देणार

ॲड.के.बी.खोसे,गेवराई
मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई,
ता.गेवराई,जि.बीड
मो.नं. 9881558175
ई-मेल आय.डी.-kishorkhose1982@gmail.com

**:: जाहीर प्रगटन ::**

**गट नं. ६७**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत कोंबडवाडी, हद्दीतील जमीन गट क्र ६७ कोंबडवाडी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०८ हे. ५१ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. १९ आर असे एकून क्षेत्र ०८ हेक्टर ७० आर असून त्याचा आकार ०६ रू. ८६ पैसे गट क्र. ६७ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क ६७ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - कोंबडवाडी राजपिंपरी शिव पश्चिमेस - गट नं. ७४ व ७३
दक्षिणेस - गट नं. ६८ उत्तरेस - गट नं. ६६

गट नं. ६७ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | तारु काशिनाथ जाधव | ७२ | १.४४ | ००.०४ | १ |
| २. | निला जेमा जाधव | १०० | ०.६४ | ००.०४ | ४२६ |
| ३. | भिमा सोमा जाधव | १४७ | १.४५ | ००.०४ | १ |
| ४. | शिवदास उदा राठोड | २०३ | १.४५ | ००.०१ | १ |
| ५. | भाऊ दगडु राठोड | ४८४ | ०.१७ | ००.०२ | ३४३ |
| ६. | गुलाब दगडु राठोड | ४८६ | ०.३९ | ००.०० | ३४३ |
| ७. | अंकुश दगडु राठोड | ४८७ | ०.४६ | ००.०१ | ३४३ |
| ८. | भगवान दगडु राठोड | ४८८ | ०.४६ | ००.०१ | ३४३ |
| ९. | राहु दगडु राठोड | ५१७ | ०.३९ | ००.०० | १२३ |
| १०. | उत्तम दगडु राठोड | ५२१ | ०.३९ | ००.०१ | ५४२ |
| ११. | बाबु दगडु राठोड | ५२३ | ०.४७ | ००.०० | ३४३ |
| १२. | कांता शंकर उजगीरे | ५४८ | ०.८० | ००.०० | ४२६ |

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील शेत जमीन गट क्र ६७ या बाबत आमचे पक्षकार यांचे सोबत व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच आमचे पक्षकार सदरील शेत जमीन कायम खरेदीखता आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या प्रकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच रजिस्टर्ड खरेदीखत आधारे खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर शेत जमीन गट क्र ६७ हा निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे शेत जमीन गट क्र. ६७ चे वरील संपूर्ण मुळ मालकाने आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरीलशेत जमीन गट क्र. ६७ च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी, व इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ७ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी. कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर गटातील संपूर्ण मिळकत निर्वाद आहे असे समजून कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेत जमीन गट क्र ६७ मधील संपूर्ण गटातील संपूर्ण व मुळ मालकाकडून खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील वत्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी वरील नमूद गट क्र. ६७ या ७/१२ अभिलेख मधील जे वहीती हक्कात आहेत किंवा मयत आहेत ते त्यांचे वारस बाबत तसेच सहमती पत्र देणार आहेत व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास नमूद शेतकरी यांच्याकडून खरेदी खत करून आमचे पक्षकार यांच्या हक्कात देणार आहेत. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत :- जाहीर प्रगटन देणार

ॲड.के.बी.खोसे,गेवराई
मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई,
ता.गेवराई,जि.बीड
मो.नं. 9881558175
ई-मेल आय.डी.-kishorkhose1982@gmail.com

**:: जाहीर प्रगटन ::**

महोदय,
आपल्या लोकप्रिय दैनिकात खालील जाहीर प्रगटण प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

**गट नं. ६५**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत कोंबडवाडी, हद्दीतील जमीन गट क्र ६५ कोंबडवाडी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०५ हे. ४१ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. १४ आर असे एकून क्षेत्र ०५ हेक्टर ५५ आर असून त्याचा आकार ०५ रू. ०१ पैसे गट क्र. ६५ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क ६५ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - कोंबडवाडी राजपिंपरी शिव पश्चिमेस - गट नं. ७५
दक्षिणेस - गट नं. ६६ उत्तरेस - गट नं. ६४

गट नं. ६५ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीराम उदा राठोड | ३ | ०.९० | ००.०२ | १ |
| २. | भिमा उदा राठोड | १४४ | ०.९० | ००.०२ | १ |
| ३. | रोहीदास उदा राठोड | १८१ | ०.८९ | ००.०२ | ७७४ |
| ४. | शिवदास उदा राठोड | २०३ | ०.९० | ००.०३ | १ |
| ५. | सखाराम उदा राठोड | २२३ | ०.९० | ००.०३ | १ |
| ६. | आलु उदा राठोड | ५९६ | ०.९० | ००.०२ | १ |

**गट नं. ६६**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत कोंबडवाडी, हद्दीतील जमीन गट क्र ६६ कोंबडवाडी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०४ हे. ६२ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. १२ आर असे एकून क्षेत्र ०४ हेक्टर ७४ आर असून त्याचा आकार ०४ रू. २८ पैसे गट क्र. ६६ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क ६६ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - कोंबडवाडी राजपिंपरी शिव पश्चिमेस - गट नं. ७४
दक्षिणेस - गट नं. ६७ उत्तरेस - गट नं. ६५

गट नं. ६६ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | पारुबाई रोहीदास राठोड | ७८० | २.३१ | ००.०६ | ७५३ |
| २. | रंगुबाई अंकुश राठोड | ७८१ | २.३१ | ००.०६ | ७५४ |

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील शेत जमीन गट क्र ६५ व ६६ या बाबत आमचे पक्षकार यांचे सोबत व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच आमचे पक्षकार सदरील शेत जमीन कायम खरेदीखता आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या प्रकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच रजिस्टर्ड खरेदीखत आधारे खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर शेत जमीन गट क्र ६५ व ६६ हा निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे शेत जमीन गट क्र. ६५ व ६६ चे वरील संपूर्ण मुळ मालकाने आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरीलशेत जमीन गट क्र. ६५ व ६६ च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी, व इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ७ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी. कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर गटातील संपूर्ण मिळकत निर्वाद आहे असे समजून कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेत जमीन गट क्र ६५ व ६६ मधील संपूर्ण गटातील संपूर्ण व मुळ मालकाकडून खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील वत्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी वरील नमूद गट क्र. ६५ व ६६ या ७/१२ अभिलेख मधील जे वहीती हक्कात आहेत किंवा मयत आहेत ते त्यांचे वारस बाबत तसेच सहमती पत्र देणार आहेत व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास नमूद शेतकरी यांच्याकडून खरेदी खत करून आमचे पक्षकार यांच्या हक्कात देणार आहेत. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत :- जाहीर प्रगटन देणार

ॲड.के.बी.खोसे,गेवराई
मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई,
ता.गेवराई,जि.बीड
मो.नं. 9881558175
ई-मेल आय.डी.-kishorkhose1982@gmail.com

**:: जाहीर प्रगटन ::**

**गट नं. २९४**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९४ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०४ हे. ०० आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०४ हेक्टर ०० आर असून त्याचा आकार ०३ रू. ३४ पैसे गट क्र. २९४ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९४ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. २९५ उत्तरेस - गट नं. ५१७

गट नं. २९४ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिजाबाई प्रकाश जाधव | ११९ | ०.८१ | ००.०० | २४६८ |
| २. | विश्वनाथ काळु राठोड | ७३९ | ०.८१ | ००.०० | २४७२ |
| ३. | आसाराम काळु राठोड | १५६३ | ०.८० | ००.०० | २४३३ |
| ४. | रचना सचिन जाधवर | १७७४ | ०.५६ | ००.०० | २७९३ |
| ५. | सुमनबाई निला राठोड | ७६०३ | ०.००.५० | ००.०० | २७६४ |
| ६. | विश्वास निलु राठोड | ७६०४ | ०.००.५० | ००.०० | २७६४ |
| ७. | बंडु निला राठोड | ७६०५ | ०.००.५० | ००.०० | २७६४ |
| ८. | राजु निला राठोड | ७६०६ | ०.००.५० | ००.०० | २७६४ |

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील शेत जमीन गट क्र २९४ या बाबत आमचे पक्षकार यांचे सोबत व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच आमचे पक्षकार सदरील शेत जमीन कायम खरेदीखता आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या प्रकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच रजिस्टर्ड खरेदीखत आधारे खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर शेत जमीन गट क्र २९४ हा निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे शेत जमीन गट क्र. २९४ चे वरील संपूर्ण मुळ मालकाने आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरीलशेत जमीन गट क्र. २९४ च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी, व इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ७ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी. कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर गटातील संपूर्ण मिळकत निर्वाद आहे असे समजून कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेत जमीन गट क्र २९४ मधील संपूर्ण गटातील संपूर्ण व मुळ मालकाकडून खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील वत्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी वरील नमूद गट क्र. २९४ या ७/१२ अभिलेख मधील जे वहीती हक्कात आहेत किंवा मयत आहेत ते त्यांचे वारस बाबत तसेच सहमती पत्र देणार आहेत व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास नमूद शेतकरी यांच्याकडून खरेदी खत करून आमचे पक्षकार यांच्या हक्कात देणार आहेत. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत :- जाहीर प्रगटन देणार

ॲड.के.बी.खोसे,गेवराई
मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई,
ता.गेवराई,जि.बीड
मो.नं. 9881558175
ई-मेल आय.डी.-kishorkhose1982@gmail.com

**:: जाहीर प्रगटन ::**

**गट नं. २९५**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९५ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०० हे. ८८ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०० हेक्टर ८८ आर असून त्याचा आकार ०० रू. ७४ पैसे गट क्र. २९५ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९५ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. २९६ उत्तरेस - गट नं. २९४

गट नं. २९५ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | राम लक्ष्मण राठोड | १२३६ | ०.४४ | ००.०० | १४४४ |

**गट नं. २९६**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९६ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०० हे. ९२ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०० हेक्टर ९२ आर असून त्याचा आकार ०० रू. ७७ पैसे गट क्र. २९६ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९६ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. २९७ उत्तरेस - गट नं. २९५

गट नं. २९६ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुमन वसंत राठोड | १६८०८ | ०.९२ | ००.०० | ५४५७ |

**गट नं. २९७**

आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व सूचनेनुसार तमाम सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.ता.गेवराई जि.बीड पैकी ग्रामपंचायत राजपिंपरी, हद्दीतील जमीन गट क्र २९७ राजपिंपरी गटातील सर्व शेतकरी यांच्या मालकी व ताब्यातील भोगवटादार वर्ग १ मधील शेत जमीन एकूण क्षेत्रफळ ७/१२ अभिलेखानुसार ०१ हे. ८६ आर व पोट खराब क्षेत्र ०० हे. ०० आर असे एकून क्षेत्र ०१ हेक्टर ८६ आर असून त्याचा आकार ०१ रू. ५५ पैसे गट क्र. २९७ मधील खरेदी करावयाचे आहे त्यामधील क्षेत्राचे हिस्सेदार व मुळ मालक खालील प्रमाणे आहेत. गट क २९७ शेत जमीन चतुः सिमा खालील प्रमाणे .

पर्वेस - गट नं. २९३ पश्चिमेस - गट नं. ३०१
दक्षिणेस - गट नं. २९८ उत्तरेस - गट नं. २९६

गट नं. २९७ या गटातील

| अ. क्र. | नाव | ८/अ खाते नं. | नावावरील लागवडी योग्य क्षेत्र हे.आर. | पो.खराब हे.आर. | फेरफार क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १. | धारु सिताराम राठोड | २९९ | ०.६२ | ००.०० | ५२२१ |
| २. | छब्बाबाई नवनाथ राठोड | १६६४८ | ०१.२४ | ००.०० | ५२२१ |

येणे प्रमाणे चतुःसिमेच्या आतील शेत जमीन गट क्र २९५, २९६ व २९७ या बाबत आमचे पक्षकार यांचे सोबत व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच आमचे पक्षकार सदरील शेत जमीन कायम खरेदीखता आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या प्रकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच रजिस्टर्ड खरेदीखत आधारे खरेदीखत करण्याचे ठरले आहे. सदर शेत जमीन गट क्र २९५, २९६ व २९७ हा निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे शेत जमीन गट क्र. २९५, २९६ व २९७ चे वरील संपूर्ण मुळ मालकाने आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरीलशेत जमीन गट क्र. २९५, २९६ व २९७ च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध, वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी, व इतर हक्क असेल तर सबळ पुराव्यानिशी ७ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी. कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर सदर गटातील संपूर्ण मिळकत निर्वाद आहे असे समजून कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेत जमीन गट क्र २९५, २९६ व २९७ मधील संपूर्ण गटातील संपूर्ण व मुळ मालकाकडून खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील वत्यानंतर आलेले आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत. तरी वरील नमूद गट क्र. २९५, २९६ व २९७ या ७/१२ अभिलेख मधील जे वहीती हक्कात आहेत किंवा मयत आहेत ते त्यांचे वारस बाबत तसेच सहमती पत्र देणार आहेत व संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता झाल्यास नमूद शेतकरी यांच्याकडून खरेदी खत करून आमचे पक्षकार यांच्या हक्कात देणार आहेत. करीता हे जाहीर प्रगटण.

मार्फत :- जाहीर प्रगटन देणार

ॲड.के.बी.खोसे,गेवराई
मा.दिवाणी व फौजदारी न्यायालय गेवराई,
ता.गेवराई,जि.बीड
मो.नं. 9881558175
ई-मेल आय.डी.-kishorkhose1982@gmail.com

# गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे जिवनामध्ये स्वाभिमान निर्माण होतो - प्रा. दिलीप आडे

लातूर /प्रतिनिधी

आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची अंमलबजावणी संपूर्ण देशात सुरू आहे त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे जीवनामध्ये स्वाभिमान निर्माण होतो असे प्रतिपादन प्राध्यापक दिलीप आडे यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात 'व्यक्तिमत्व विकास व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या उद्घाटन समारंभात प्रा.दिलीप आडे बोलत होते.

या कार्यक्रमाची सुरुवात जगतज्योती लोकशाहीचे जनक महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. संजय गवई,उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील, प्रमुख वक्ते लायन्स राजमुद्रा अकॅडमीचे उत्तम पवार व संदीप युनिव्हर्सिटी नाशिकचे प्रा. प्रतीक अनारसे आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र समन्वयिका डॉ.अश्विनी रोडे यांची उपस्थित होती. याप्रसंगी उत्तम पवार म्हणाले की, करियर घडवायचे असेल तर आभासी जगातून विद्यार्थ्यांनी बाहेर यावे आणि त्यांचे आयडल इतर कोणी नसून त्यांचे आई-वडील असावे. लातूर पॅटर्न हे महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे ते फक्त अकरावी बारावी वर्गापर्यंतच पण बारावीनंतरच्या शिक्षणामध्ये लातूर पॅटर्न कुठे दिसून येत नाही अशी खंतही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

यावेळी प्रा. प्रतीक अनारसे म्हणाले की, बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. पारंपारिक शिक्षणाच्या व्यतिरिकत सध्या जगाला आवश्यक असलेल्या कोर्सेसच्या संदर्भात विद्यार्थ्यांनी माहिती घेत राहावी. अशा पद्धतीचे शिक्षण संदीप युनिव्हर्सिटी नाशिकमध्ये सध्या देण्याचे कार्य चालू आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. वनिता पाटील यांनी केले.



अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आभासी जग आणि काल्पनिक जगातून बाहेर येऊन आपल्या वास्तविक परिस्थितीची जाण ठेवावी. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घन:शाम ताडेवार तर आभार डॉ. अश्विनी रोडे यांनी मानले. या कार्यक्रमास कला शाखा समन्वयक प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रविंद्र सोनोने, वाणिज्य शाखा समन्वयक प्रा. वैशाली जयशेट्टे, प्रा. शैलेश कानडे, स्टाफ सेक्रेटरी प्रा. रविंद्र सुरवसे, प्रा. केशव बिरादार, प्रा. कल्पना गिराम, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. मनोज वैरागकर, प्रा. शिवशंकर कामाजी, प्रा. शुभांगी खुब्बा, प्रा. महादेवी पटने, प्रा. परमेश्वर पाटील, प्रा. शितल झुंजे, प्रा. विष्णू तातपूरे यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थीनी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश राठोड, आनंद खोपे, राजाभाऊ बोडके यांनी परीश्रम घेतले.

# मस्साजोग खून प्रकरणी निष्पक्षपाती चौकशी करा

डॉ.योगेश क्षीरसागर यांची मागणी; मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

बीड (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणात निष्पक्षपाती चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांनी गुरुवारी (दि.१२) मस्साजोग येथे जाऊन देशमुख कुटुंबियांची भेट घेतली आहे.

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचे मूळ कारण पवनचक्की ठरली. याप्रकरणात कुणीही राजकारण करू नये. आरोपींवर कडक कारवाई करावी. या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच, मागील काही दिवसांपासून बीड मतदारसंघात पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जात आहे, यात स्थानिक आमदारांचे आर्थिक हितसंबंध देखील आहेत. त्यांच्या वरदहस्तामुळे अनेक शेतकऱ्यांना त्रास होत आहे. याबाबत आपण अनेकदा आवाज उठविलेला असून बीडच्या आमदारांसह पवनचक्की कंपनीच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची कसून चौकशी करण्याची गरज आहे, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.



# सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकर्याला अटक करा मागणीसाठी वडवणी तालुक्यात कडकडीत बंद

वडवणी /प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र बीड जिल्ह्यात उमटत असून काल गुरुवार रोजी वडवणी शहरातही या घटनेचा निषेध म्हणून वडवणी बंदची हाक देण्यात होती यामध्ये या खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य सुत्रधाराला तात्काळ अटक करण्यासाठी वडवणी शहरासह तालुक्यात कडकडीत बंद ठेवून घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

बीड जिल्ह्यात गेल्या काही महिन्यापासून गुन्हेगारीच्या घटनेमध्ये वाढ होत असून यामध्ये पोलीस प्रशासनाचा वचक राहिलेला नसल्यामुळे दिवसाढवळ्या अपहरण करून खून करण्याच्या घटना घडत आहेत यामध्ये बीडचा बिहार झाल्याची चर्चा संपूर्ण बीड जिल्हा नागरिकांमधून होत आहे यामध्ये गेल्या दोन-तीन दिवसापूर्वी केज तालुक्यातील मसाजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांची काही गुंड यांनी निर्घृणपणे अपहरण करून हत्या केली या घटनेचा बीड जिल्ह्यामध्ये संताप व्यक्त केला जात असून ठीक ठिकाणी आंदोलने होत आहे याचे पडसाद आता संपूर्ण महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यात उमटल्याचे पहावयास मिळत असून आज या घटनेचा निषेध म्हणून वडवणी तालुका वाशीयांनी वडवणी बंदची हाक दिली होती त्यामध्ये सकल मराठा समाज व सर्व राजकीय पक्षाच्या वतीने काल वडवणी शहरासह तालुक्यात कडाकडीत बंद पाळला यामध्ये वडवणी शहरात तरूण युवक रस्त्यावर उतरले यामध्ये शहरात पायी रॅली काढून या खुनाच्या घटनेतील राजकीय वरदहस्त असणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अटक करण्याची मागणी करण्यात आली तसेच यावेळी सकल मराठा समाजाच्या वतीने तहसीलदार यांना लेखी निवेदन देण्यात आले यावेळी हजारो मराठा तरुण या आंदोलनात सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले तरी वडवणी शहरात कसलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.






# हिवरसिंगा ची शाळा भौतीक सुविधायुक्त व सुसज्ज होणार

## (शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या बैठकित विविध सुविधा करण्याचे नियोजन)

शिरुर /प्रतिनिधी

हिवरसिंगा केंद्रिय प्राथमिक शाळा हिवरसिंगा ता.शिरूर येथील शाळेतील विविध भौतिक सुविधांचे नियोजन करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली.यामध्ये श्री.विश्वाभंर शिंदे (उपसरपंच) श्री.माऊली शिंदे,श्री.भिमराव सानप,श्री.विनोद टाकसाळ (अध्यक्ष.शा.व्य.स.), श्री.राजू सानप (उपाध्यक्ष) श्री.शिवराम राऊत( संपादक साप्ता.एज्युकेशन रिपोटर्स) .शाम दुधाळ(पालक सदस्य), सिध्देश्वर दुधाळ (पालक) श्री.कंठाळे सर, व्ही.के.मिसाळ सर.गौतम औसरमल (उपसंपादक दै.प्रजापत्र) उपस्थिती होती.या बैठकित निजामकालीन मोडकळीस आलेल्या शाळा पुनर्बांधणी योजना अंतर्गत दोन वर्ग खोल्या मंजुर आहेत त्यांचे बांधकाम करणे,तसेच ग्रामपंचायत हिवरसिंगा यांच्या माध्यमातून स्वच्छतागृह बांधकाम करणे,शाळेच्या आवारातील पाणीपुरवठा जलकुंभ डागडुजी करणे, शाळेतील संरक्षण भिंत, क्रिडा साहित्य उपलबधता, परिपाठासाठी लाऊड स्पिकर, परिपाठ मैदानात प्लेवरब्लाक बसवणे,शालेय पोषण आहार किचन दुरूस्ती,विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी, प्रयोगशाळेसाठी स्वतंत्र कक्ष मागणी करणे,संगणक मागणी व कक्ष उभारणे, परसबाग तयार करणे.अशा विविध भौतिक सुविधा करण्याचे नियोजन करण्यात आले.यासाठी राज्यशासनाच्या राजमाता जिजाऊ वर्गबांधनी योजना,सह ग्रामपंचायत हिवरसिंगा, शासनाच्या विविध योजना अंतर्गत सहभागी होऊन विद्यार्थी विकासा साठी आवश्यक आसणा-या भौतिक, शैक्षणिक, व शारिरिक क्षमता विकासाच्या उपाय योजना करण्याचे त्यासाठी सर्वांनी एकदिलाने शासनाकडून निधी प्राप्त करून जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळेच्या सर्व भौतिक सुविधा युक्त करण्यासाठी प्रयत्न करण्याचे निश्चित करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक श्री.प्रल्हाद भाऊ सानप. श्री.रामेश्वर पांडुळे,श्री.गवळी गणेश, गावकरी सह श्री.घोरड सर,दत्तात्रय दुधाळ सर,श्री.संदीप कदम सर, चि.मयुर शिंदे सर,श्रीम.मिसाळ मॅडम,श्रीम.बोडखे मॅडम, श्रीम.जेधे मॅडम,मुकिंद वाकळे,नामदेव वाकळे,राजू गायकवाड, व ग्रामस्थ,पालक व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत होती.



शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
अॅडव्हान्स अॅनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर
डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे
(नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर
व लेझर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच
महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूग्णांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.
मुळव्याध करीता विशेष उपचार
- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पिटलचा पत्ता
शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँडच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी सजग रहा - तहसीलदार चंद्रकांत शेळके

बीड राजयोग प्रतिनिधी

गुरुवार दिनांक १२ डिसेंबर रोजी घाटसावळी मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , ग्रामसेवक , कृषी सहायक , बीएलओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार तसेच अंगणवाडी सेविका इत्यादी उपस्थित होते . सर्वप्रथम सरपंच, सर्व गावकरी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या वतीने चंद्रकांत शेळके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला व त्यानंतर घाटसावळी मंडळाचे मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्यावतीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी घाटसावळी बाकरवाडीचे सरपंच बाबासाहेब पवार , सदस्य प्रकाश लांडे , नवनाथ चव्हाण

नागरीक अरुण लांडे , दादासाहेब लांडे , भारत फड , सिद्धार्थ खवतड , विनोद तांगडे , संकेत तांगडे , विलास कदम , सुंदर लांडे , ग्रामसेवक सचिन कदम , किरण सानप , भाऊसाहेब मिसाळ , बाबासाहेब घुमरे , पवळ , कृषी सहाय्यक श्रीमती कुलकर्णी , कमलाकर शिंदे , प्रविण अबूलगे , बी एल ओ सतिश लांडे , जोशी , श्रीमंत चव्हाण , अशोक चव्हाण , श्सुमित्रा आडसूळ, केसाळे सर , तांदळे सर ,सालपे सर , जोगदंड सर , सानप सर , स्वस्त धान्य दुकानदार शिवकुमार ढेपे , विष्णू गाडे , मदन लांडे , नवनाथ चव्हाण , विक्रम पोपळे , पोलिस पाटील कल्याण वरकड हजर होते . सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगितले तुमचे प्रश्न तुम्ही बिनधास्तपणे मांडा . आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यांना सक्षमपणे सोडवू .




सर्वसामान्य लोकांच्या अडचणी जाणून घेऊन , त्यांची प्रलंबित कामे याबद्दल सविस्तर चर्चा करून त्यावर तात्काळ कार्यवाही करावी , अशा सूचना संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या . गावकऱ्यांनीही आपले प्रश्न गावासंबंधी असो किंवा वैयक्तिक असो बेधडकपणे मांडले आणि तहसीलदारांनी त्यांचे यथोचित समाधान केले . यातुन त्यांची कार्यतत्परता आणि लोकांविषयी असलेला कनवाळूपणा दिसून आला . त्यानंतर कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक , कृषी सहाय्यक यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन शेतकऱ्यांपर्यंत योजना लवकरात लवकर पोहोचवाव्यात त्या पारदर्शक असाव्यात , वेळोवेळी गावांना भेटी द्याव्यात व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात , शेतकऱ्यांची कामे तात्काळपणे पूर्ण करावीत अशा सूचना त्यांनी दिल्या . तदनंतर उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा घेतला . ग्रामपंचायत अधिकारी यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या पाहिजेत तसेच त्यांना सोयी सुविधा पुरविल्या पाहिजेत .त्यांची सर्व कामे वेळेवर पूर्ण केली पाहिजेत. अशाही सूचना दिल्या . घाटसावळी येथील स्मशानभूमीचा प्रश्न लोकांनी त्यांच्यासमोर मांडला . त्यानुसार ' गाव तेथे स्मशानभूमी ' अंतर्गत संबंधित कर्मचारी व अधिकारी यांनी गावकऱ्यांना लवकरात लवकर जमीन उपलब्ध करून त्यांचा स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल , असे आश्वासन दिले . त्यानंतर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला . एकही पात्र लाभार्थी रेशन मिळण्यापासून वंचित राहू नये अशा फक्त सूचना सर्व स्वस्त धान्य दुकानदारांना शेळके यांनी दिल्या .

यानंतर उपस्थित असलेले सर्व बीएलओ यांना नवीन नाव नोंदणी संदर्भात सूचना दिल्या . उपविभागीय अधिकारी कविता जाधव या नेहमी शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी सजग असतात . ग्राउंड लेव्हल ला जाऊन सर्वांचे प्रश्न जाणून घ्या , असे त्यांचे म्हणणे असते . बैठकीत पुढे बोलताना प्रामुख्याने अनुदानापासून कोणीही पात्र शेतकरी वंचित राहू नये , तसेच सलोखा योजनेचा प्रचार , प्रसार , प्रसिद्धीकरणावर भर द्यावा , असे यावेळी तहसीलदारांनी सांगितले . मंडळ अधिकारी , तलाठी यांनी नियमानुसार जे फेरफार मंजूर करणे योग्य असतील , ते तात्काळ मंजूर करावे . कोणताही फेरफार प्रलंबित ठेवण्यात येऊ नये , नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही किंवा त्यांना असुविधा होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहावे , असेही आवाहन केले .

तहसीलदार शेळके यांनी ग्रामीण भागात स्वतः येऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना केल्या, याबद्दल सर्वसामान्य जनतेने समाधान व्यक्त केले .

यावेळी घाटसावळी मंडळाचे मंडळ अधिकारी सतीश बांगर , घाटसावळी सजेचे ग्राम महसूल अधिकारी महेश आखाडे , पोखरी (मैंदा) सजेचे ग्राम महसूल अधिकारी नितीन पोपळे , मन्यारवाडी सजेचे ग्राम महसूल अधिकारी करण कुमार बनसोडे , ताडसोन्ना सजेच्या ग्राम महसूल अधिकारी मोहिनी मसवले , केसापुरी परभणी सजेचे ग्राम महसूल अधिकारी आसाराम शेळके मंडळातील कृषी सहाय्यक , पोलीस पाटील व ग्रामसेवक इत्यादी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# संत हेच भगवंताकडे जाण्याचा सोपा मार्ग दाखवतात

## ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह भ प माधव महाराज डाके यांचे लोळदगाव येथील कीर्तनातून प्रतिपादन...

बीड ।प्रतिनिधी

या भूतलावर जन्म मिळणे दुर्लभ असून, देवाची भेट होणे हेच मनुष्य जनमाचे सर्वोच्च साध्य आहे. भगवंत प्राप्तीचा हा सुलभ मार्ग दाखवणारे वाटाडे संतच असतात. असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक श्री.ह.भ.प .माधव महाराज डाके काठवडेकार यांनी लोळदगाव येथील श्री.क्षेत्र दत्त मंदिर येथे आयोजित वार्षिक अखंड हरिनाम सोहळ्यातील चौथे किर्तन पुष्प गुंफताना केले ते पुढे म्हणाले की, एकदा का संतांची भेट झाली की ईश्वर प्राप्ती होतेच. नव्हे तर मनुष्य जन्मापासून कायमची मुक्ती मिळते. असे अनमोल विचार ह भ प माधव महाराज डाके यांनी मांडले

काल बुधवार दिनांक ११/१२/ २०२४ रोजी गीता जयंतीच्या पावन पर्वावर बीड पासून जवळच असलेल्या श्री दत्त संस्थान लोळदगाव येथे चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात गीता जयंती व मोक्षदा एकादशीच्या पवित्र त्रिवेणी संगमावर डाके महाराज यांची कीर्तन सेवा संपन्न झाली. त्या प्रसंगी ते बोलत होते.

कीर्तनाच्या निरूपणासाठी महाराजांनी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा

श्रश्र कुळी कन्या पुत्र होती जे सात्विक श्रश्र

श्रश्रतयाचा हरिक वाटे देवा श्रश्र

या अभंगावर महाराजांनी सविस्तर चिंतन मांडले. पुढे आपल्या कीर्तन सेवेमध्ये डाके महाराज म्हणाले की, भगवंताची भेट होण्यासाठी अगोदर संत भेट महत्त्वाची आहे एकदा का संतांची भेट



झाली की मग आपणास भगवंत भेटलाच म्हणून समजावे असा विश्वास डाके महाराज यांनी आपल्या कीर्तन सेवेच्या चतुर्थ पुष्प माले मधून विचार मांडले. हे सर्व पटवून देण्यासाठी महाराजांनी नारद आणि रावणाची भेट हा प्रसंग सांगितला. याबरोबरच राक्षस कुळामध्ये जन्म घेऊन सुद्धा भक्त प्रल्हादने नामस्मरणाने आपले कृत कल्याण साधले. याबरोबरच भगवंताची दया आणि करुणा सांगताना विष पाजण्यास आलेल्या पुतनेला देखील त्या भगवंताने मोक्ष प्रदान केला हे सप्रमाण विषद केले.

सदरील कीर्तन सेवेतील उदाहरणे ऐकताना श्रोते अतिशय मंत्रमुग्ध झाले होते .काल मोक्षदा एकादशी व गीता जयंतीच्या निमित्ताने डाके महाराज यांनी भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर सांगितलेली गीता सोप्या शब्दात सांगितली. याबरोबरच गीतेमधील कित्येक श्लोक महाराजांनी सोप्या भाषेमध्ये समजावून सांगितले. याबरोबरच ग्रंथराज ज्ञानेश्वरी मधील संत भेटीचे महत्त्वही विशद केली. ज्ञानेश्वरीच्या ओव्या सांगून व त्याचा साध्या सोप्या भाषेमध्ये अर्थ सांगून त्यांचं महत्त्व आपल्या आयुष्यात संत संगती लाभणे हे भाग्याचेच आहे असे अनमोल विचार मांडले. कीर्तन सेवेनंतर मठाधिपती ह भ प गुरु वसंत महाराज यांनी डाके महाराज यांचा स्वतः फेटा बांधून शाल श्रीफळ देऊन आदर सत्कार केला. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कीर्तन सेवेला गायक सुग्रीव महाराज डाके व मृदंग साथ तालमणी नरहरी दळे यांची लाभली .यांच्या अप्रतिम मृदंग वादनाने व सुग्रीव महाराज यांच्या गायनाने किर्तन सेवेमध्ये अधिकच रंगत भरली. कीर्तनासाठी लोळदगाव,लिंबागव, शीदोड,किन्हीपाई,कुर्ला,आदी गावासह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.




स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात स्व. गोपीनाथ मुंडे यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यासभा उपाध्यक्ष तथा पर्यवेक्षक श्री उमेश जगताप, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर, श्री. रमण कुलकर्णी, श्री. हरिभाऊ साबळे, सौ. आरती कुलकर्णी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी श्री. रमण कुलकर्णी यांनी व्यक्ती परिचय या सदरात स्व. मुंडे साहेब यांच्या जीवन प्रवासाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

# देशमुखांच्या हत्येनंतर ग्रामपंचायती बंद ठेवून निषेध




**तिसऱ्या आरोपीला अटक, दोन आरोपींना १७ डिसेंबरपर्यंत कोर्टाकडून पोलिस कोठडी**

केज /प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील मुख्य आरोपी प्रतीक घुले यास बीड पोलिसांनी पुण्याजवळील रांजणगावात पकडले. दुसरीकडे संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्यानंतर त्यांचे डोके, चेहरा व छातीवर गंभीर मार लागल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या घटनेनंतर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी बुधवारी कार्यालय बंद ठेवून घटनेचा निषेध केला. याप्रकरणी फरार झालेल्या सात आरोपींपैकी जयराम चाटे (रा. तांबवा, ता. केज) व महेश केदार (रा. मैंदवाडी) या दोघांना तांबवा येथून सोमवारी अटक करण्यात आली होती. दोन्ही आरोपींना बुधवारी केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. या दोघांना १७ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश कुणाल जाधव यांनी दिले. सरपंच देशमुख यांच्या मृतेदहाचे मंगळवारी रात्री ११ वाजता शवविच्छेदन झाले. त्यानंतर मध्यरात्री १२.३० वाजेच्या सुमारास शिंदी रस्त्यावरील त्यांच्या शेतात पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्य आरोपी प्रतीक घुले याला रांजणगाव येथून बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक करून बीडला आणले. त्यानंतर त्याला केज पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

# नांदेडला दुसऱ्यांदा बनावट औषधपुरवठा

## सव्वा लाख गोळ्या सील:ऑगस्ट महिन्यातही आढळला बनावट औषधांचा साठा

बीड / प्रतिनिधी

बीडच्या 'स्वाराती'नंतर आता नांदेडच्या जिल्हारुग्णालयातही बनावट गोळ्यांचा प्रकार समोर आलाआहे. औषधविभागाने केलेल्यातपासणीच्य ।अहवालातनांदेडमध्येही बनावट गोळ्यांचा साठा आढळला. आतायाप्रकरणी गुन्हा नोंद करण्याच्या हालचाली सुरू झाल्याआहेत. १ लाख २८ हजार गोळ्या औषध विभागानेप्रतिबंधित केल्या आहेत. विशेष म्हणजे नांदेडरुग्णालयात दुसऱ्यांदा हा प्रकार घडला. यापुर्वी ऑगस्टमहिन्यातही बनावट गोळ्यांचा साठा आढळला होता.

बीडमधील अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयालापुरवठा करण्यात आलेली ॲझिमसिम हीअँटिबायोटिकची गोळी बनावट आढळली होती.याप्रकरणी चार जणांवर गुन्हा नोंद केला आहे. यात मोठेरॅकेट समोर आले असून राज्यात अनेक ठिकाणी अशाप्रकारे पुरवठा झाला आहे. दरम्यान, नांदेड येथील जिल्हारुग्णालयाला पुरवठा करण्यात आलेली न्यूक्लॉस ६२५ हीॲमॉक्सिक्लॅव्ह घटक असलेली गोळी बनावटअसल्याची नवी माहिती उघड झाली आहे. औषधविभागाने तपासणीसाठी मे २०२३ मध्ये या गोळीचा नमुनातपासणीसाठी घेतला होता. ३० ऑक्टोबर २०२४ रोजीत्याचा अहवाल औषध विभागाला मिळाला आहे. याअहवालानुसार ही गोळी तपासणीत अप्रमाणित ठरली.आता औषध विभागाने या प्रकरणी तपास सुरू केलाआहे. पुरवठ्याची साखळी शोधून या प्रकरणी गुन्हानोंदवला जाणार आहे.

केरळच्या औषध नियंत्रकांना पाठवले पत्र

न्यूक्लॉस ६२५ ही नांदेड जिल्हा रुग्णालयाला पुरवठा झालेली गोळी



हीकेरळच्या मेलवॉन कंपनीचे उत्पादन आहे. ही कंपनी अस्तित्वात नसल्याचासंशय आहे. त्याबाबत केरळच्या औषध नियंत्रकांना पत्र पाठवून कंपनीचीमाहिती मागवली आहे. संशयावरून हा नमुना तपासला होता. त्याचाअहवाल अप्रमाणित आला. १ लाख २८ हजार गोळ्या प्रतिबंधित केल्याआहेत. - नामदेव भालेराव, औषध निरीक्षक, नांदेड

न्यूक्लॉस गोळी म्हणजे प्रतिजैविक औषध

ॲमोक्सिलिन आणि क्लॅव्हूलॅनेटया घटकांचे मिश्रण असलेली हीगोळी आहे. याला ॲमॉक्सिक्लॅव्हअसेही म्हणतात. हे एक प्रतिजैविक(अँटिबायोटिक) असून त्वचा,फुफ्फुस, मूत्रमार्गाचा संसर्ग, नेझलसायनस संसर्गावरील उपचारासाठीहे औषध वापरले जाते, असेवैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

### गुन्हा नोंदवला जाणार

नांदेड रुग्णालयात औषध विभागानेदोन गोळ्यांचे नमुने तपासणीसाठीघेतले होते. यापूर्वी एकाचा अहवालअप्रमाणित आल्याने ऑगस्ट महिन्यातगुन्हा नोंदवलेला आहे. आता दुसराअहवालही अप्रमाणित आला आहे.लवकरच या प्रकरणातही गुन्हा नोंदकेला जाणार आहे. याची प्रक्रिया सुरूआहे. औषधांची तपासणी केलीजाईल. - राजगोपाल बजाज,सहायक आयुक्त, संभाजीनगर विभाग

# विघनवाडी ते राजुरी २२ किमीचे काम पूर्ण

## नव्या वर्षात बीडपर्यंत धावणार रेल्वे, जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात रेल्वे रुळाच्या सुरक्षेची चाचणी

बीड /प्रतिनिधी

नगर-बीड परळी रेल्वेमार्गाची अंमळनेर ते विघनवाडी अशी ३३.१२ किलोमीटरची चाचणी ९ ऑगस्ट २०२४ रोजी पूर्ण झाल्यांनतर आता शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशा ३५ किलोमीटर अंतरापैकी २२ किमीचे नवगण राजुरी गावापर्यंत रेल्वेचे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२४ अखेर रेल्वेची चाचणी होणार आहे. पुढच्या टप्प्यातील नवगण राजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरात रेल्वे रूळ अंथरण्याचे काम सध्या प्रगतिपथावर



असून जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षेची चाचणी घेण्यात येणार आहे.

या रेल्वे मार्गावरील ५०० मीटर लांबीचे १८ मीटर उंचीचे एकूण ९ पूल उभारण्यात आले आहेत. या प्रकल्पातील बीड ते वडवणी ३५ किलोमीटर अंतरापैकी २० किलोमीटर अंतरात रेल्वे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. बीड ते वडवणीचा टप्पा मार्च २०२५ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे अभियंता सूरज यांनी सांगितले. नगर व बीड या दोन्ही जिल्ह्यांतील स्थानिक व्यापार आणि उद्योगांना चालना मिळणार आहे. मराठवाडा क्षेत्राच्या सामाजिक-आर्थिक विकासाला हातभार लागणार आहे.

# मृत सरपंच देशमुखांच्या कुटुंबासाठी एका तासात चौदा लाखांची मदत

## सर्वपक्षीय बैठकीत उद्या संभाजी महाराज चौकातून मदत फेरीचे आयोजन

माजलगाव / प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निर्घुण हत्या केल्याची घटना घडली होती. या घटनेचे सर्वत्र पडसाद उमटले असुन माजलगावकरांनी मात्र त्यांची असलेली मदतीची परंपरा जोपासत मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना मदतीचा हात देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. बुधवार (११ डिसेंबर) रोजी विवीध पक्ष व संघटनांच्या झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत १ तासात १३ लक्ष ६८ हजार रूपयांची मदत जाहिर झाली आहे. उद्या शुक्रवार (१३ डिसेंबर) शहरातील संभाजी महाराज चौकातुन सकाळी १०.३० वाजता मदतफेरी काढण्यात येणार आहे. याप्रसंगी प्रशासनाला निवेदन देखील देण्यात येणार आहे.शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात बुधवार (११ डिसेंबर) रोजी आमदार प्रकाश सोळंके यांचे वतीने विवीध सामाजिक संघटना, व्यापारी महासंघ, वकील संघटना, पतसंस्था संघटना, पत्रकार संघ, रोटरी क्लब, सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सांगली येथील जवान चंद्रशेखर मोरे यांच्या कुटूंबीयांना दिलेल्या मदतीप्रमाणेच देशमुख कुटूबीयांना देखिल मदत देण्यासाठी निर्णय घेण्यात आला. यानंतर मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबीयांना मदत व्हावी यासाठी शुक्रवारी शहरामध्ये मदतफेरीचे आयोजन करण्यात आले असुन सात दिवस मदत संकलन करण्यात येणार आहे. यासाठी या मदतफेरीस सर्व संघटना, पदाधिकारी, सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. झालेल्या घटनेचा निषेध करत सरपंच संतोष देशमुख यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. प्रसगी परभणी येथे झालेल्या घटनेचाही निषेध या सर्वपक्षीय बैठकीत करण्यात आला.

# परभणी येथील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ आज परळी बंदची हाक

## सर्व पक्षीय,व्यापारी,आंबेडकर अनुयायीनी पुकारला बंद

परळी /प्रतिनिधी

परभणी येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळ भारतीय संविधान पुस्तेकीची प्रतिकृती साकारण्यात आली होती या संविधान पुस्तेकीची एका नराधमा कडुन विटंबना करण्यात आली यामुळे आम्हा भारतीयांच्या भावना दुखावल्या असुन या नराधमाला कडक शासन करण्यासाठी परळीतील सर्व पक्षीय,व्यापारी महासंघ व आंबेडकर अनुयायांच्या वतीने शुक्रवार दि.१३ डिसेंबर रोजी परळी शहर बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

आज बुधवार दि११ डिसेंबर रोजी परळीतील सर्व पक्षीय,व्यापारी महासंघ व आंबेडकर अनुयायांच्या वतीने नेते,पदाधिकारी कार्यकर्ते यांचघ व्यापक बैठक घेण्यात आली या बैठकीत परभणी येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया जवळ भारतीय संविधान पुस्तेकीची प्रतिकृती साकारण्यात आली होती या संविधान पुस्तेकीची एका नराधमा कडुन विटंबना



करण्यात आली या घटनेचा निषेध नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान याच बैठकीत परभणी येथील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ शुक्रवारी परळी बंदची हाक देण्यात आली असून या घटनेतील आरोपी ला कडक शासन करण्यासाठी जलद न्यायालयात हे प्रकरण चालवून या देशद्रोही मनोविकारी नराधमाला देशद्रोहाचा गुन्हा दाखल करुन अति गंभीर कडक शासन तर करावेच परंतु या घटने मागे कोणाचा विकृत मास्टर माईंड आहे का याचा ही तपास करावा या मागणी करिता शुक्रवारी परळी बंदची हाक देण्यात आली असुन याबाबतचे निवेदन सर्व पक्षीय,व्यापारी,आंबेडकर अनुयायांच्या वतिने स्वाक्षरी असलेले तहसीलदार व पोलीसांना देण्यात आले आहे.तरी परळी शहरातील सर्व व्यापरी बांधवांनी या बंद मध्ये सहभागी होऊन या देशद्रोही घटनेचा निषेध नोंदवावा

# धनंजय मुंडेंच्या मागणीला मोठे यश

## सोयाबीनच्या हेक्टरी उत्पादकतेत दुप्पटीपेक्षा अधिक वाढ

**मुंबई - बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी असून, धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश आले आहे. बीड व लातूर जिल्ह्यात सोयाबीन खरेदी करण्यासाठी हमी भाव खरेदी केंद्रांना प्रति हेक्टरी उत्पादकतेची जी मर्यादा देण्यात आली होती, त्यात दुप्पटीपेक्षा अधिक वाढ करण्यात आली आहे.**

बीड जिल्ह्यातील हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रांवर आता प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल इतकी वाढ करण्यात आली असून लातूर जिल्ह्यात देखील प्रति हेक्टरी १२.३० क्विंटल वरून ही मर्यादा वाढवून १९.९९ क्विंटल करण्यात येत असल्याचा निर्णय सहकार व पणन विभागाने घेतला आहे.

राज्याचे कृषिमंत्री असताना धनंजय मुंडे यांनी यावर्षी हमीभावाने अधिकृत खरेदी केंद्रांच्या मार्फत शेतकऱ्यांची सोयाबीन किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सोयाबीन खरेदीसाठी प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल इतकी मर्यादा पणन विभागाने निश्चित केली होती.

या मर्यादेमुळे शेतकऱ्यांच्या समोर उर्वरित



सोयाबीनचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे या मर्यादेत वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या प्रमाणात सोयाबीन खरेदी केली जावी, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी लावून धरली होती. अखेर मुंडेंच्या या मागणीस यश आले असून आता बीड जिल्ह्यात अधिकृत केंद्रांच्या माध्यमातून नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची प्रति हेक्टरी ९.५० क्विंटल ऐवजी २१.५१ क्विंटल पर्यंतची सोयाबीन शेतकऱ्यांना हमीभावाने विकता येणार आहे. ,